Receipt (pavti)

73/642

Thursday,January 23 ,2025

5:09 PM

# पावती

Original/Duplicate

नोंदणी क्रं. :39म

Regn.:39M

पावती क्रं.: 963 दिनांक: 23/01/2025

गावाचे नाव: **ठाणे**

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: **टनन1-642-2025**

दस्तऐवजाचा प्रकार : **कार्यकंत्राट**

सादर करणाऱ्याचे नाव: **पंकज - शिरसाट**

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 1000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 400.00 |
| पृष्ठांची संख्या: 20 | |
| एकूण: | रु. 1400.00 |

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे 5:27 PM ह्या वेळेस मिळेल.

Sub Registrar Thane 1

सह दुय्यम निबंधक वर्ग-२

ठाणे-१

बाजार मुल्य: रु.1 /-

मोबदला रु.1/-

भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 500/-

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.400/-

डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 0125231003924 दिनांक: 23/01/2025

बँकेचे नाव व पत्ता:

2) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.1000/-

डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH014851785202425E दिनांक: 23/01/2025

बँकेचे नाव व पत्ता:

नोंदणी फी माफी असल्यास तपशिल :-

1) Fee Adjustment : Fee Adjustment (yashada training) code added for keeping tack of adjusted fees

मूळ दस्त परत मिळाला

Schutria Anand Bhosale



Scanned with OKEN Scanner

73/642

Monday,27 January 2025 12:36 PM

इतर पावती

Original/Duplicate

नोंदणी क्रं. :39म

Regn.:39M

पावती क्रं.: 1074 दिनांक: 27/01/2025

गावाचे नाव: -ठाणे

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: टनन1-642-2025

दस्तऐवजाचा प्रकार : कार्यकंत्राट

सादर करणाऱ्याचे नाव: पंकज - शिरसाट

वर्णन

| | |
|---|---|
| दस्त हाताळणी फी | रु. 100.00 |
| पृष्ठांची संख्या: 5 | |
| एकूण: | रु. 100.00 |

Sub Registrar Thane 1

1); देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.100/-

डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 0125245320381 दिनांक: 27/01/2025

बँकेचे नाव व पत्ता:

1/27/2025

Scanned with OKEN Scanner

**CHALLAN**
**MTR Form Number-6**

| GRN | MH014851785202425E | BARCODE | | Date | 23/01/2025-11:44:14 | Form ID | 25.2 |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Stamp Duty | **TAX ID / TAN (If Any)** | |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | THN1_HQR SUB REGISTRA THANE URBAN 1 | **Full Name** | PANKAJ SHIRSHAT |
| **Location** | THANE | | |
| **Year** | 2024-2025 One Time | **Flat/Block No.** | MOUJE THANE |

| Account Head Details | Amount In Rs. | | |
|---|---|---|---|
| | | **Premises/Building** | |
| 0030046401 Stamp Duty | 500.00 | **Road/Street** | THANE |
| 0030063301 Registration Fee | 1000.00 | **Area/Locality** | THANE |
| | | **Town/City/District** | |
| | | **PIN** | 4 0 0 6 0 1 |
| | | **Remarks (If Any)** | SecondPartyName=SUCHITRA ANAND BHOSALE~CA=1~Marketval=1 |
| DEFACED ₹1500.00 DEFACED | | | |
| **Total** | 1,500.00 | **Amount In Words** | One Thousand Five Hundred Rupees Only |

| **Payment Details** | IDBI BANK | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 69103332025012312306 | 2910960354 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 23/01/2025-11:44:57 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | IDBI BANK | |
| Name of Branch | | Scroll No., Date | | Not Verified with Scroll | |

Department ID :
Mobile No. : 9822224546

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.

टनन ९
दस्त क्र. ६४२ /२०२५
९ | २४

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE No.1, सह. दुय्यम निबंधक ठाणे क्र. ९, सत्यमेव जयते, जि. ठाणे, DIST. THANE

## Challan Defaced Details

| Sr. No. | Remarks | Defacement No. | Defacement Date | UserId | Defacement Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | (iS)-73-642 | 0008219424202425 | 23/01/2025-17:08:55 | IGR113 | 500.00 |
| 2 | (iS)-73-642 | 0008219424202425 | 23/01/2025-17:08:55 | IGR113 | 1000.00 |
| | | | Total Defacement Amount | | 1,500.00 |



Print Date 23-01-2025 05:09:43

Scanned with OKEN Scanner

## CHALLAN
**MTR Form Number-6**

| GRN | MH014851785202425E | BARCODE | | Date | 23/01/2025-11:44:14 | Form ID | 25.2 |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Stamp Duty | **TAX ID / TAN (If Any)** | |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | THN1_HQR SUB REGISTRA THANE URBAN 1 | **Full Name** | PANKAJ SHIRSHAT |
| **Location** | THANE | | |
| **Year** | 2024-2025 One Time | **Flat/Block No.** | MOUJE THANE |
| | | **Premises/Building** | |

| Account Head Details | Amount In Rs. | | |
|---|---|---|---|
| 0030046401 Stamp Duty | 500.00 | **Road/Street** | THANE |
| 0030063301 Registration Fee | 1000.00 | **Area/Locality** | THANE |
| | | **Town/City/District** | |
| | | **PIN** | 4 0 0 6 0 1 |
| | | **Remarks (If Any)** | SecondPartyName=SUCHITRA ANAND BHOSALE~CA=1~Marketval=1 |
| **Total** | 1,500.00 | **Amount In Words** | One Thousand Five Hundred Rupees Only |

टनन ९

दस्त क्र. ६८२/२०२५

२ / २४

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR THANE No.1
सह. दुय्यम निबंधक ठाणे क्र. ९ यांची मुद्रा
सत्यमेव जयते
जि. ठाणे
DIST. THANE

| **Payment Details** | IDBI BANK | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 69103332025012312306 | 2910960354 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 23/01/2025-11:44:57 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | IDBI BANK | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID :
Mobile No. : 9322224546

**NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.**
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोदंणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.



Print Date 23-01-2025 11:45:08

Scanned with OKEN Scanner

| Department of Stamp & Registration, Maharashtra | | | |
|---|---|---|---|
| Receipt of Document Handling Charges | | | |
| PRN | 0125231003924 | Date | 23/01/2025 |
| Received from PANKAJ SHIRSHAT, Mobile number 9322224546, an amount of Rs.400/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office S.R. Thane 1 of the District Thane. | | | |
| Payment Details | | | |
| Bank Name | SBIN | Date | 23/01/2025 |
| Bank CIN | 10004152025012303728 | REF No. | 502301558015 |
| This is computer generated receipt, hence no signature is required. | | | |

टनन ९

दस्त क्र. ६७२ /२०२५

3 | 24

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE No.1

सत्यमेव जयते

जि. ठाणे

DIST. THANE

Scanned with OKEN Scanner

टनन १

दस्त क्र. ६७०२/२०२५

४ | २५

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE NO.1

DIST. THANE

## कार्यकंत्राट

सदर कार्यकंत्राट आज दि.२३/०१/२०२५ रोजीपासुन ११ महिन्याचे कालावधीकरीता करण्यात येत आहे.

**श्री. पंकज शिरसाट,**
पोलीस उप आयुक्त,
शहर वाहतुक विभाग,
ठाणे शहर, ठाणे–४००६०१ ..........................................लिहुन घेणार

व

**श्रीमती. सुचित्रा आनंद भोसले,**
पत्ता:–बी४–३०३,
वेदांत कॉम्प्लेक्स,
वर्तकनगर, ठाणे–(प)–४००६०६...............................लिहुन देणार

**कारणे करारनामा लिहुन देतो जे,**

सदर कर्षीत वाहन मालक/ठेकेदार नामे **श्रीमती. सुचित्रा आनंद भोसले**, पत्ता – बी ४ – ३०३, वेदांत कॉम्प्लेक्स, वर्तकनगर, ठाणे प. ४००६०६ यांचे मालकीचे कर्षीत वाहन क्र. **MH-01-EF-5869** हे ठाणे शहर पोलीस आयुक्तालय वाहतूक विभागाच्या कारवाई अंतर्गत वाहने उचलून आणणे कामी टोईंग चार्जेस तत्वावर **दि.२३/०१/२०२५ ते दि.२२/१२/२०२५** पावेतो ११ महिन्यांच्या कालावधी करिता खालील अटीं व शर्तीवर सेवा देणे करिता नेमण्यात येत आहे.

**१)** सदर कर्षीत वाहन हे दररोज (विना सुट्टी) २४ तास ठाणे पोलीस आयुक्तालयातील वाहतुक विभागाचे उप विभागातील कार्यक्षेत्रात कर्तव्य करेल व त्यानंतर तातडीने कामासाठी कार्यालयात २४ तास उपलब्ध राहील तसेच वेळोवेळी आदेशानुसार इतर बंदोबस्तकामी उपलब्ध राहील.

**२)** सदर वाहतूक नियमनाचे उल्लंघन करणारे हलकी, जड–अवजड वाहने उचलणे कामी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात वाहतुक कार्यालयाने नेमणुक केल्यानुसार कर्तव्यासाठी कोठेही कर्षीत वाहने नेली जातील.

Ashnale

Scanned with OKEN Scanner

टनन ९
दस्त क्र. ६८२/२०२५
५ / २५

३) सदर एका कर्षीत वाहनावर कर्षीत कामी १ चालक, १ क्लिनर, २ मदतनीस कामगार ठेवण्यात येतील व त्यांचे पगार (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार यांचेकडून देण्यात येईल. करार लिहून घेणार यांना सदर कामगारांचे पोलीस चारित्र्य पडताळणी अहवाल (CHARACTER VERIFICATION) सादर करावयाचे आहे.

४) सदर कर्षीत वाहनाच्या इंधन व देखभालीचा खर्च (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार स्वत: करतील.

५) सदर आर.सी. बुकवर वाहनाची नोंद ही कर्षीत वाहन अशी नोंद असावी. तसेच कर्षीत वाहनांवरील ड्रायव्हर, क्लिनर व कामगार यांना निळा डांगरी गणवेश व गणवेशावर ओळखपत्र (ज्यावर प्रभारी अधिकाऱ्याची सही केलेले) लावलेले असेल. त्यावर ON POLICE DUTY असे लिहलेले असावे. तसेच कर्षीत वाहनावरील कामगार हे सुदृढ बांध्याचे, निर्व्यसनी, व्यवस्थित केस कापलेले व वयाची १८ वर्षे पुर्ण केलेले असावेत. त्याचप्रमाणे नागरीकांशी उद्धट वर्तन न करणारे असावेत.

६) सदर कर्षीत वाहन नेहमी सुस्थितीत ठेवण्यात येऊन त्याचा सर्व देखभालीचा खर्च (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार यांचे कडून करण्यात येईल व त्याबाबत कोणतीही आर्थिक मदत ते लिहून घेणार कडून मागणार नाहीत. अथवा बिले सादर करणार नाहीत.

७) सदर कर्षीत वाहनाची सर्व रजिस्ट्रेशन्स सर्टिफिकेटस, टॅक्सेशन सर्टिफिकेटस, फिटनेस सर्टिफिकेटस, पियुसी, व विमा पॉलिसी अद्यावत ठेवतील. आरटीओकडील कागदपत्रे व आरटीओ वाहने वाहून नेण्याकरीताचा तात्पुरता परवाना (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार स्वत: काढून घेतील. तसेच ११ महिन्यांच्या आत मुदत संपत असेल तर ती अद्यावत करुन घेतील.

८) सदर कर्षीत वाहन कर्तव्यावर असताना अचानक बिघाड झाल्यास तात्काळ पर्यायी दुसऱ्या कर्षीत वाहनाची व्यवस्था (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार यांचे कडून करण्यात येईल. व लिहून घेणार यांचे पुर्व परवानगीने त्याचा वापर करण्यात येईल. बदलेल्या वाहनाचा क्रमांक टोईंग पावतीवर नमूद करावा लागेल.

९) सदर लिहून देणार निविदा अर्जात व करारनाम्यात नमूद केलेल्या अटीं व शर्तींच्या अधिन राहतील.

१०) सदर (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार दिलेल्या सुचनेप्रमाणे कर्षीत वाहनावरील एका कामगारा मार्फत फोटोग्राफी/व्हिडीओग्राफीचे काम करुन घेईल.

Scanned with OKEN Scanner

टनन १
दस्त क्र. ६८२/२०२५
८ / २५
THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE No.1
DIST. THANE

११) सदर वेळोवेळी नियमांत होणारे बदल (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार यांचेवर बंधनकारक असतील.

१२) सदर कर्षीत वाहन मालक/चालक, ऑपरेटर हे कर्षीत वाहनावर कर्तव्यावर असलेल्या वाहतुक शाखेच्या कर्मचाऱ्याच्या आदेशाने कामकाज व निर्देशीत केलेलीच वाहने उचलतील.

१३) सदर कर्षीत वाहन चालक, ऑपरेटर हे हेल्पलाईन/भ्रमणध्वणी क्रमांक उपलब्ध करुन देतील.

१४) सदर (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार यांनी कराराच्या व अटीं शर्तीचे उल्लंघन केल्यास (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार यांच्याकडून ठाणे पोलीस आयुक्तालयातील दि. २५/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार दंड वसूल केला जाईल. (प्रतिदिन १,०००/— रु प्रमाणे)

१५) सदर कराराच्या अटीं व शर्तीचे उल्लंघन झाल्यास (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार कर्षीत वाहनांचे ठेकेदार यांची १,००,०००/— रुपये (एक लाख रुपये मात्र) ही सुरक्षा अमानत रक्कम/बँक गॅरंटी जप्त केली जाईल त्याबाबत त्यांना कोणत्याही लवादात दावा दाखल करता येणार नाही.

१६) सदर कर्षीत वाहन वाहतुक शाखेच्या कामकाजाकरीता वारंवार गैरहजर राहत असेल तर करार कोणत्याही क्षणी एकतर्फी रद्द करण्याचा अधिकार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग ठाणे यांना राहील. तसेच कर्षीत वाहनांच्या अंतर्गत उप विभागीय बदल्या नियमीत स्वरुपात करण्यात येतील.

१७) सदर कर्षीत वाहन चालकांचा वाहन चालविण्याचा परवाना वैध असल्याबाबत (कर्षीत वाहन मालक) लिहून देणार हे वेळोवेळी खात्री करतील. तसेच चालकाचा परवाना कमीत कमी ३ वर्षे पुर्वीचा असावा.

Scanned with OKEN Scanner

टनन ९
दस्त क्र. 6182/२०
6 / 24
DIST. THANE

१८) सदर वाहन टोईंग चार्जेस पावती हे वाहतुक विभागाकडून प्रमाणीत करुन पुरविण्यात येतील. तसेच कार्यवाही करिता सदर प्रमाणीत करण्यात आलेली पावती पुस्तकेच वापरण्यात येतील. त्याकरिता स्वतंत्र रजिस्टर तयार करुन पावती पुस्तकाच्या नोंदी रजिस्टर मध्ये नियमीत घेतील. तसेच सदर रजिस्टर प्रभारी अधिकारी वाहतूक उप विभाग यांचे स्वाधीन असेल. तसेच पावती पुस्तकातील प्रत्येक पावतीवर GST क्रमांक नमूद असणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे कर्षीत वाहन मालक यांनी १८ टक्के GST भरलेची पावती या कार्यालयास सादर करावी.

१९) सदर कर्षीत वाहनाच्या पुढील व मागील बाजूस दिसेल अशा ठिकाणी आरटीओ रेजिस्ट्रेशन क्रमांक (RTO मान्यताप्राप्त) लिहून घेणे बंधनकारक आहे.

२०) सदर करार झाल्यावर आवश्यक असणारा सेवाकर व इतर कर भरण्याची जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहील तसेच लागणारी कागद, साधन सामुग्री रेजिस्ट्रेशन खर्च लिहून देणार स्वत: करतील.

२१) सदर कर्षीत वाहनांकडून वाहन मालकाने वाहन उचलताना नुकसान झाल्यास किंवा कोणताही अपघात झाल्यास कर्षीत वाहन चालक व मालक लिहून देणार हे जबाबदार राहतील. तसेच चारचाकी वाहन उचलताना पुढील दोन चाके अधांतरी उचलून सुस्थितीत वाहन टो करणे अपेक्षीत आहे. कोणतेही नुकसान झाल्यास कर्षीत वाहन मालक नुकसान भरुन देणेस जबाबदार राहतील.

२२) सदर पोलीस खात्यातील अधिकारी/अंमलदार यांचेशी कर्षीत वाहन मालकांचे अथवा कामगारांचे रक्ताचे नातेसंबंध असल्साचे निदर्शनास आल्यास कोणत्याही क्षणी करार रद्द करण्याचे अधिकार पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर यांना राहील.

२३) सदर कर्षीत वाहन कर्मचारी यांचेवर विविध पोलीस बंदोबस्ताचे वेळी वाहने उचलणे तसेच बॅरेकेटींग व इतर वर्कींग, करणे बंधनकारक राहील.

टनन १
दस्त क्र. ६८८/२०२५
८/२४
SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE No 1 DIST. THANE

२४) सदर कर्षीत वाहनामध्ये वाहने टोईंग करण्यासाठी सर्व आवश्यक साहित्य फर्स्ट एड किट बॉक्स, जम्बो टॉर्च, पीए सिस्टिम/मेगाफोन, फ्लुरोसंट जॅकेट, रस्सी, ३ जामर व फोटोग्राफी करीता कॅमेरा हॅन्डीकॅम/मोबाईल (१० दिवस पुरेल इतका बॅकअप घेता येईल एवढी मेमरी असलेला), वाहतूक कार्यालयाचा संपर्क क्रमांक व पत्ता असलेले स्टिकर्स व चारचाकी वाहन उचलणे करीता ऑटोमॅटीक/मॅन्युअल अंडर लिफ्ट (पंजा) इ. साधन सामुग्री अद्यावत आहे. याची लिहून देणार यांनी वेळोवेळी खात्री करावी.

२५) ज्या वाहनास कर्षीत करावयाचे आहे. अशा वाहनाचे दरवाजे लॉक, वाहन गिअरमध्ये असल्यास किंवा हॅन्ड ब्रेक लावलेले असल्यास अशा वाहनांना कर्षीत करण्यापुर्वी कर्षीत वाहनांवारील पोलीस अधिकारी / अंमलदार यांची परवानगी घेऊन वाहन कर्षीत करावे. कोणतीही वाहने परस्पर कर्षीत करु नये

२६) सदर कर्षीत वाहनाद्वारे टोईंग करण्यात येणाऱ्या वाहन चालक/मालकांकडून भरुन घेण्यात येणारे कर्षण शुल्क हे मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कडून निर्गमीत करण्यात आलेल्या अधिसूचना क्रमांक **ठाआ/पशा/वाहतुक/०१/२०२१, दि. १२/०१/२०२१** नुसार निश्चित करण्यात आलेले आहेत.

सदर दर खालील प्रमाणे:—

| **अ.क्र.** | **वाहनाचा प्रकार** | **कर्षण शुल्क** |
|---|---|---|
| १ | दोनचाकी वाहन | रु. २००/— GST सह |
| २ | तीनचाकी वाहन (रिक्षा व इतर) | रु. २००/— GST सह |
| ३ | चारचाकी वाहन (कार जीप व इतर) | रु. ३००/— GST सह |

२७) सदर मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १२७ प्रमाणे कर्षीत वाहनाने काम करणे बंधनकारक राहील.

२८) सदर वरील अटीं व शर्तीचा कोणत्याही प्रकारचा भंग झाल्यास करार कायम ठेवण्याचा अथवा रद्द करण्याचा अथवा अटींमध्ये यथायोग्य बदल/सुधारणा करण्याचा पुर्ण अधिकार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर यांना राहील.

Scanned with OKEN Scanner

टनन १

दस्त क्र. ६४२/२०२५

९ | २५

**लिहून घेणार**



(श्री.पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त
शहर वाहतुक विभाग, ठाणे
शहर, ठाणे

**लिहून देणार**



श्रीमती. सुचित्रा आनंद भोसले

**सक्षिदार:–**

सही.................................................

१) विजयसिंह रामचंद्र भोसले

सहायक पोलीस आयुक्त ठाणे

वाहतुक विभाग

सही.................................................

२) रामचंद्र कशिनाथ मोहिते

पोलीस निरीक्षक, प्रशासन शहर

वाहतुक विभाग

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र पोलीस

जा.क्र.पोआठा/ठाणे-वाहतूक/३३८/२०२१.
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय, ठाणे शहर.
दिनांक :- २५/१०/२०२१.

टनन ९
दस्त क्र. ६८२ /२०२५
१० | २४

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE NO. 1 DIST. THANE

विषय :- ठाणे वाहतूक उप विभागांना वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कर्षित कारवाई करणाऱ्या कर्षित वाहन(**Towing Van**) कंत्राटदार कंपनीसंबंधी नियुक्ती, परिचलन आणि कर्षित वाहनावरील कर्तव्य संबंधाने करावयाच्या अंमलबजावणीची मानक प्रक्रिया (**STANDARD OPERATING PROCEDURE**) निर्गमित करण्याबाबत.

---

## —: परिपत्रक :—

उक्त विषयात नमुद केल्यानूसार ठाणे वाहतूक विभागातर्फे वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या, रस्त्यात बंद पडलेल्या अवजड वाहनांना बाजूला करण्याकरीता, वाहतूक कोंडी करणाऱ्या नो पार्कींग मधील हलक्या वाहनांवर कारवाई करण्याकरीता आणि अन्य वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कसूरदार वाहनांवर कारवाई करण्याकरीता कर्षित वाहन (Towing Van) कंत्राटदार कंपनीची नियुक्ती करून त्यांचे मार्फतीने कर्षित कारवाई केली जाते. ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत असलेल्या एकूण १८ वाहतूक उप विभागांमध्ये जड वाहनांकरीता एकूण ०७ व हलक्या वाहनांकरीता एकूण ३८ इतकी कर्षित वाहने कार्यरत आहेत. सदर कर्षित वाहनांच्या नेमणूका कर्षित कंपन्यांसोबत झालेल्या 'प्रशासकीय अटी व शर्थी' नूसार करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या अटी व शर्थी या काही स्वरूपात कालबाह्य असल्याने त्यांना अद्यावत करणे आवश्यक आहे. त्याकामी ठाणे वाहतूक उप विभागांमध्ये कर्षित वाहनांच्या 'नियुक्ती', 'परिचलन' आणि 'कर्षित वाहनावरील कर्तव्य' संबंधाने करावयाच्या अंमलबजावणीची मानक प्रक्रिया (STANDARD OPERATING PROCEDURE) खालील मुद्यांनूसार निर्गमित करण्यात येत आहे.

## ➢ कर्षित वाहनांच्या नियुक्ती संबंधीची मार्गदर्शक सुचनावली.

### १) प्रकल्प कार्यान्वित समितीची स्थापना (P.I.C.) :-

कर्षित वाहन सेवेच्या नियुक्तीकरीता ठाणे आयुक्तालय स्तरावर प्रकल्प कार्यान्वित समितीची स्थापना करण्यात यावी.सदर समितीने सध्या कार्यरत असलेल्या तसेच नविन इच्छूक कर्षित वाहन कंपनीच्या पात्रता निकषाची नियमावली तयार करून त्या संबंधी उद्दीष्ट पुर्ती करण्याकरीता गतीमान पध्दतीने बैठकांचे आयोजन करावे.

प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित समिती (पी.आय.सी.) सदस्य पुढीलप्रमाणे :--

१. अध्यक्ष – अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, ठाणे.
२. सचिव – पोलीस उप आयुक्त (वाहतूक), ठाणे.
३. सदस्य – सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे.
४. सदस्य – सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक विभाग, कल्याण.
५. सदस्य – सहा. पोलीस निरीक्षक, नारपोली वाहतूक विभाग.

### २) ठाणे वाहतूक विभागाकरीता आवश्यक कर्षित वाहने :-

ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत एकुण १८ वाहतुक उप विभाग कार्यान्वीत आहेत. त्यामध्ये जड वाहनांकरीता एकुण ७ व हलक्या वाहनांकरीता एकुण ३८ कर्षित वाहने कार्यान्वीत आहेत. समितीने सध्या अस्तित्वात असलेल्या कर्षित वाहनांच्या संख्ये इतक्या कर्षित वाहनांकरीता प्रकल्प कार्यान्वित करावा.

Scanned with OKEN Scanner

टनन-५ दस्त क्र. ६८२ /२०२५ ११ / २५

३) कर्षित वाहन कंपणी पात्रता निकष :—

१. कर्षित क्षेत्रात किमान १ वर्ष कामकाजाचा अनुभव.
२. कर्षित कंपनी ROC/Private limited farm / Proprietor farm अंतर्गत नोंदणीकृत प्रमाणपत्र.
३. कंपनीचा गुमास्ता परवाना.
४. कंपनीचा जीएसटी आणि आयकर भरणा केलेला असावा.
५. कंपनीच्या नावे असलेले चालू बँक खाते.
६. दडाची रक्कम ऑनलाईन भरणा करण्याची सुविधा/यंत्रणा असावी.
७. कंपनीचे कार्यालय ठाणे आयुक्तालय कार्यक्षेत्रात असावे.
८. इतर कोणत्याही शासकीय विभागाच्या काळया यादीत नसल्याबाबतचे घोषणापत्र.

४) कर्षित वाहन परिचलन नियमावली :—

खालील प्रमाणे मनुष्यबळ वाटप (१२ तासांकरीता ) सुचविण्यात येत आहे.

१. एक चालक प्रति वाहन.
२. दोन मदतनीस प्रति वाहन.
३. एक रोखपाल प्रति वाहतूक विभाग.

आवश्यक मनुष्यबळास आणि कामाचे तासाबाबत खालील प्रमाणे सुचना आहेत :—

१. चालक आणि मदतनीस यांची शैक्षणीक पात्रता कमीतकमी १०वी पास असावी.
२. मदतनिस यांना वाहन कर्षित करण्याचे तांत्रिक ज्ञान असणे आवश्यक आहे.
३. मदतनीस यांनी मान्यताप्राप्त वैदयकिय अधिकारी यांचेकडून तंदुरस्ती प्रमाणपत्र सादर करावे.
४. कार्यान्वित करण्यात आलेल्या मनुष्यबळाचा (चालक, मदतनीस,रोखपाल आणि इतर कर्मचारी)यांना देण्यात येणारे वेतन व भत्ते हे महाराष्ट्र किमान वेतन कायदा व तरतुदींचा भंग होणार नाहीत यासंबंधीचे घोषणापत्र सादर करावे.

५) व्यवसायिक मुल्यांकन निकष :—

१. कराराची कालमर्यादा ही पहिला टप्पा सुरू झाल्यापासून जास्तीत जास्त ११ महिन्यांकरीता असावी.
२. निविदा ही कमीत कमी कर्षीत दर असलेली असावी.
३. ११ महिन्यांच्या करारामध्ये कमी बोली असणाऱ्या L1निविदाकारास प्राधान्य देण्यात यावेत.
४. सध्या अस्तित्वात असलेले दरफलक खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | टोईंग चार्जेस (रू.) |
|---|---|---|
| १ | दोनचाकी वाहन | रू.२००/—GSTसह |
| २ | तीन चाकी (ऑटो रिक्षा) | रू.२००/—GSTसह |
| ३ | कार, जीप | रू.३००/—GSTसह |
| ४ | टेम्पो, मिनी बस | रू.४००/—GSTसह |
| ५ | मोठी लॉरी, ट्रक, टॅकर, ट्रेलर व बसेस | रू.६००/—GSTसह |

६) कर्षित वाहन सेवा कालमर्यादा —

सेवाकरार सुरू झाल्याच्या तारखेपासुन पुढील ११ महिने अथवा कमाल ३३५ दिवस इतके यापैकी एक सेवा कालावधी असावा.

Scanned with OKEN Scanner

**७) कर्षित केलेल्या वाहनांच्या झालेल्या नुकसान भरपाईबाबत**

टनन १
दस्त क्र. ९२ /२०२५
९२ | २४
THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE NO.1 DIST. THANE

वाहतुक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनांवर कर्षित कारवाई करताना कारवाई ग्रस्त वाहनांचे नुकसान झाल्यास आणि नुकसान भरपाईचा प्रश्न उपस्थित झाल्यास, सदरबाबत जबाबदारी ही केवळ कर्षित कारवाई करणाऱ्या संबंधीत कर्षित वाहनकंत्राटदाराची राहील असे सेवा करारात नमूद असावे.

**८) कर्षित वाहन सेवा टप्पा करार.**

खाजगी कर्षित वाहन करार चालू होणेपूर्वी व चालू झाल्यानंतर सेवा टप्पा करार शर्तीनुसार प्रकल्प कार्यान्वित करण्यास उशीर, कर्षित वाहन उपलब्ध न केल्यास, नादुरूस्त यंत्रामुळे माहितीचे आदानप्रदान न होणे, नादुरूस्त कार्यप्रणाली, पोलीस अधिकाऱ्यांचे आदेशाचे उल्लंघन, व्यापारी चिन्हांची दृष्यमानता इ.बाबत **अटी व शर्तीचे पालन न करणाऱ्या खाजगी कर्षित कंपन्यांना शिक्षा खालीलप्रमाणे.**

१. दुचाकी कर्षित वाहन उपलब्ध न केल्यास रूपये १०००/— प्रती दिन /प्रती वाहन.
२. नादुरूस्त यंत्रामुळे माहितीचे आदानप्रदान न होणे रूपये १०००/— प्रती दिन /प्रती वाहन.
३. पोलीस अधिकाऱ्याबरोबर गैरवर्तन रूपये १०००/— प्रती धटना.
४. व्यापारी चिन्हांचे पालन न करणे रूपये १०००/— प्रती वाहन / त्रैमासिक

**९) बँक गॅरंटी / तारण रक्कम अटी व शर्थी**

सध्या ठाणे वाहतुक शाखेत कार्यरत असलेल्या खाजगी कर्षित वाहन कंपन्यांकडून बँक गॅरंटी घेण्यात आलेली नाही. तरी सेवा शर्थीच्या सकारात्मक नियमनाकरीता रूपये १,००,०००/— प्रती कर्षित वाहन याप्रमाणे ११ महिन्याचे कालावधीसाठी बँक गॅरंटी घेण्यात यावी.

## ➢ कर्षित वाहनांच्या नियमना संबंधीची मार्गदर्शक सुचनावली.

१) वाहतूक विभाग, ठाणे शहर यांना पुरविण्यात येणारी कर्षित वाहनांचे संपूर्ण कागदपत्र (उदा. रजिस्ट्रेशन, पी. यु. सी., इन्शुरन्स, फिटनेस, एम.व्ही.टॅक्स इ.) वेळोवेळी परीपूर्ण केलेले असावेत.

२) सदर कर्षित वाहनांचे रजिस्ट्रेशन, पी. यु. सी., इन्शुरन्स, फिटनेस, एम.व्ही.टॅक्स इ. कागदपत्रांची मुदत ही ११ महिन्यापुर्वी समाप्त होत असल्यास त्यापुढील कालावधी नमुद असणारी कागदपत्रे नव्याने इकडील कार्यालयास सादर न केल्यास त्या कर्षित वाहनाची सेवा तात्काळ खंडित करण्यात यावी.

३) कर्षित वाहन त्याच्या निर्मीती दिनांकापासून १४ वर्षे कालावधी पेक्षा जुने असता कामा नये.

४) कर्षित वाहन मालकाने कर्षित वाहनाचे सर्व प्रकारचे कर (उदा.जकात कर, सेवा कर व आयकर, जी. एस. टी. इ.)नियीमत भरावे व कर भरलेबाबतचे विवरणपत्राची प्रत किंवा भरणा करण्याचे हमीपत्रया कार्यालयात सादर करावे

५) खाजगी कर्षित वाहन मालकाने त्यांच्या वाहनावरील सर्व कर्मचाऱ्यांचे फोटो व चारित्र्याबाबत दाखला कर्मचारी वास्तव्य करीत असलेल्या स्थानिक पोलीस ठाण्यावरून प्राप्त केलेला असावा.

६) कर्षित वाहनावरील कर्तव्यावर असलेले कर्मचारी हे नीटनेटक्या व निळ्या रंगाच्या स्वच्छ गणवेशात हजर राहतील. सदर गणवेशावर पांढऱ्या रंगामध्ये 'ON POLICE DUTY' अशी अक्षरे लिहिलेली असावीत. त्यांचे केस व्यवस्थित कापलेले असावेत. त्यांची वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण व सुदृढ बांध्याचे असावेत. डयुटीवर कोणीही कर्मचारी व्यसन करणार नाही व नागरिकांशी उध्दट वर्तन करणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) कर्षित वाहनावरील कर्मचारी रात्रीचे वेळी स्वयंप्रकाशी गणवेश (फ्लुरोसेन्ट जॅकेट इ.) वापरतील. या बाबतची खबरदारी प्रत्येक कर्षित वाहन मालक घेतील. तसेच अशा गणवेशाच्या खर्चाची खबरदारी संबंधित कर्षित वाहन मालकाची राहील.

८) कर्षित वाहन मालकाने कर्षित वाहनावरील कर्मचाऱ्यांना ओळखपत्र पुरविणे आवश्यक आहे. त्यावर प्रभारी पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग हे प्रतिस्वाक्षरी करतील.

९) प्रत्येक कर्षित वाहनांवर स्वखर्चाने मोठया आकाराची विजेरी (JUMBO TORCH) ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरून रात्रीचे वेळी वाहन कर्षित करताना गफलत होणार नाही.

१०)कर्षित वाहनाच्या चालकास कमीतकमी तीन वर्षे गाडी चालविण्याचा अनुभव असावा. अशा चालकाकडे एल. एम. व्ही. व्यावसायिक/माल वाहतूक (ट्रान्सपोर्ट) वाहनचालक परवाना आवश्यक आहे.

११)कर्षित वाहनावर HANDY CAM असावा. तसेच HANDY CAM बॅकअप १० दिवसाचा असावा किंवा

Scanned with OKEN Scanner

मोबाईल फोन (१० दिवस पुरेल येवढी मेमरीकार्डसह) असावा.

१२) कर्षित वाहनावर घोषणा करण्यासाठी बॅटरीच्या सहाय्याने चालणारी मेगाफोन/PAसिस्टम उपलब्ध करावी व वाहन उचलण्यापुर्वी वाहनांच्या नंबरसह उद्घोषना करावी व त्याचे चित्रीकरन करावे.

१३) वाहतूक उप विभागांतर्गत कर्षित वाहनांच्या बदल्या करण्याचे अधिकार पोलीस उपआयुक्त, वाहतूक विभाग यांच्याकडे राखीव असतील.

टनन ९
दस्त क्र. ६१२ /२०२४
२३ / २४

१४) कर्षित वाहनामध्ये जर अचानक तांत्रिक बिघाड निर्माण झाला तर सदर कर्षित वाहन मालकाने तात्काळ संबंधित प्रभारी अधिकारी वाहतूक उपविभाग अथवा संबंधित सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे परवानगी शिवाय मूळ कर्षित वाहनाचे ऐवजी दुस—या कर्षित वाहनाची परस्पर नेमणूक करू नये. जर दुस—या कर्षित वाहनाची नेमणूक करावयाची झाल्यास नेमणूक करावयाच्या गाडींचे सर्व कागदपत्रे अधिकृत असावीत अन्यथा सदर कर्षित वाहनाची सेवा वाहतूक शाखेच्या पटलावरून कायमस्वरूपी खंडीत केली जाईल.

१५) पोलीस अधिकारी/कर्मचारी व शासकीय कर्मचारी यांचे नातेवाईकांनी कर्षित वाहन सेवा देणे बाबत अर्ज करू नयेत. अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१६) वाहन कर्षित करताना वाहनाचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कर्षित वाहन मालकाची राहील व नुकसान भरपाई कर्षित वाहन मालकास करावी लागेल.

१७) कोरोना साथीच्या पार्श्वभुमिवर कर्षित वाहनांवर काम करणारे कर्मचारी यांचे दररोज सकाळी तापमान व ऑक्सीजन लेवल पाहण्यात यावी. ( सदरची अट कोवीड साथ चालु असेपर्यंत लागु राहील )

१८) अत्यावश्यक प्रसंगी रात्रीच्या वेळी कर्षित वाहनास कर्तव्य बजवावे लागल्यास त्यावेळी कर्षित वाहनाच्या पाठीमागे फोकस लाईट/हेड लाईट/टेललाईट सुस्थितीत असावेत.

१९) कर्षित वाहनाद्वारे चारचाकी वाहन टो करण्यात येणा—या वाहनाची पुढील दोन्ही चाके अधांतरीत उचलून कोणतेही नुकसान न होता कारवाई करणे अपेक्षित आहे.

२०) कर्षित वाहन मालकाने टोईंगसाठी वाहन उचलल्या नंतर ज्या ठिकाणावरून वाहन उचलले त्या ठिकाणी वाहतुक चौकीचा पत्ता व मोबाईल नंबर असलेले स्टिकर लावणे अनिर्वाय आहे. सदर स्टिकरसाठी येणारा खर्च कर्षित वाहनमालक यांचेकडून आकारण्यात येईल.

२१) कर्षित वाहनाद्वारे टोईंग करण्यात येणा—या वाहन चालक/मालकांकडून भरून घेण्यात येणारे टोईंग चार्जेस हे मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडून निर्गमित करणेत आलेल्या अधिसूचना क्र. ठाआ/पशा/वाहतूक/०१/२०२१ , दि. १२/०१/२०२१ नुसार निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | टोईंग चार्जेस (रू.) |
|---|---|---|
| १ | दोनचाकी वाहन | रू.२००/— GST सह |
| २ | तीन चाकी (ऑटो रिक्षा) | रू.२००/— GST सह |
| ३ | कार, जीप | रू.३००/— GST सह |
| ४ | टेम्पो, मिनी बस | रू.४००/— GST सह |
| ५ | मोठी लॉरी, ट्रक, टॅकर, ट्रेलर व बसेस | रू.६००/— GST सह |

२२) कर्षित वाहनाच्या नियुक्ती संदर्भातील प्रशासकीय/कार्यकारी अटी व शर्तीचे उल्लंघन आपण केल्यास तसेच कर्षित वाहनाच्या सेवेबाबत अथवा वाहनावर काम करण्या—या कर्मचा—यांच्या वर्तनाबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता आपल्या कर्षित वाहनाची सेवा खंडीत करण्याचे अधिकार पोलीस उप आयुक्त, वाहतूक यांना राखीव असतील.

२३) नमूद अटी व शर्ती मध्ये बदल/सुधारणा करण्याचे संपूर्ण अधिकार पोलीस उप आयुक्त, वाहतूक कार्यालयाकडे राखीव असतील.

Scanned with OKEN Scanner

## ➢ कर्षित वाहनांवरील कर्तव्य संबंधीची मार्गदर्शक सुचनावली.

१) कर्षित वाहनावर नेमण्यात येणारा अंमलदार पोलीस हवालदार दर्जा पेक्षा कमी दर्जाचा नसावा. सदरचे कर्षित वाहन व त्यावरील स्टाफ यांचेवर पोलीस उप निरीक्षक अथवा त्याहून वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणात राहील.

२) कर्षित वाहनावरील अंमलदार हा कर्षित वाहनाचा प्रभारी असल्याने त्याच्या नियंत्रणाखाली कर्षित वाहनावरील चालक व कामगार काम पाहतील.

३) कर्षित वाहनावरील अंमलदार कर्तव्य करित असताना वाहनावरील कारवाई करण्यापुर्वी छायाचित्र काढतील आणि त्यानंतर काही वेळानंतर वाहन उचलुन वाहन कर्षित वाहनावर ठेवतील.

४) कर्षित वाहनाव्दारे कारवाई करत असताना वाहनाचा चालक उपस्थित राहिल्यास त्याच ठिकाणी अंमलदार हा कायदेशीर कारवाई करून सशुल्क दंडाची पावती जागेवरच देईल. वाहन उचलुन घेऊन जाणार नाही व टोईगचे चार्जेस घेणार नाही.

५) कर्षित न केलेल्या वाहनांकडून कोणत्याही परिस्थितीत कर्षित दंड आकारला जाणार नाही.

६) कर्षित वाहनांरील अंमलदार हे कर्षित वाहनांना घातलेल्या अटी व शर्ती याची जाणीव करून देतील व त्याप्रमाणे चालक कामगार राहत असल्याची खात्री करतील.

७) कर्षित वाहनावरील अंमलदार तसेच चालक व त्यावरील कामगार जनतेशी सौजन्याने वागतील कोणतेही उध्दट वर्तन करणार नाहीत.

८) कर्षित वाहनावरील अंमलदार हा कोणत्याही परिस्थितीत कारवाई करताना कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही. कोणत्याही व्यक्तीचा फोन आला तरी कारवाई केल्याशिवाय वाहन सोडणार नाही.

९) कर्षित वाहनावरील अंमलदार अथवा प्रभारी अधिकारी यांना कर्षित वाहनावरील चालक व कामगार यांचेकडुन अटी व शर्ती उघ्यंलन केल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ या कार्यालयास अहवाल सादर करतील.

१०)कर्षित वाहनावरील कामगार हे कारवाई दरम्यान कोणत्याही प्रकारे मध्यस्थाची भुमिका करणार नाही किंवा स्वतःहुन निर्णय घेणार नाही.

११)कर्षित कारवाईनंतर कसूरदार वाहनांवर दंड आकारणी करण्याकरीता, सध्या अस्तित्वात असलेल्या कर्षित दंड पावती पुस्तकात खालीलप्रमाणे बदल करण्यात यावा.

- कर्षित पावती पुस्तीकेच्या प्रत्येक पावतीवर खालील माहिती नमुद असणे आवश्यक आहे.
  १) कर्षित कंपनीचे नाव,
  २) कंपनीचा नोंदणी क्रमांक,
  ३) कंपनीचा जीएसटी क्रमांक,
  ४) कार्यालयाचा पत्ता,
  ५) मोबाईल/संपर्क क्रमांक,
  ६) प्रत्येक पावतीवर वर्ष नमुद असलेला पावती क्रमांक असावा.( उदा. १२३४/२०२१).
- कर्षित पावती पुस्तकामध्ये टोईग केलेल्या गाडीचा क्रमांक व प्रकार नमुद असावा.
- कर्षित वाहनावर कर्तव्यास हजर असलेल्या पोलीस अंमलदार यांचे नाव व हुद्दा नमुद करण्यासाठी कर्षित पावतीवर रिक्त जागा असावी. सदर ठिकाणी संबंधीत अंमलदाराने त्यांचा नाव/हुद्दा स्वतः नमुद करून स्वाक्षरी करावी.

१२) कोणत्याही परिस्थितीत खाजगी कर्षित वाहन प्रतिनीधीने सरकारी दंडाची रक्कम आपले पावती पुस्तकावर स्विकारु नये.

१३) कर्षित वाहनाचा दंड घेण्याकरीता संबंधीत कंपनीने स्वतःचा प्रतिनीधी कर्षित वाहनावर नेमावा.

१४) कर्षित वाहन प्रतिनिधी याने केवळ कर्षित केलेल्या वाहनाचा म्हणजेच फक्त टोईगचा दंड जमा करून घेतील.

१५) कर्षित करुन आणलेल्या वाहनांचा दंड कर्तव्यावरील पोलीस अंमलदार हे ऑनलाईन दंड पावती (चलन) पध्दतीने स्वतः आकारतील.

१६) अशा प्रकारे ऑनलाईन दंड पावती (ई–चलन) क्रमांक कर्षित वाहनाचे पावतीवर नमुद करावा.

Scanned with OKEN Scanner

१७) कर्षित पावती बुक जमा केल्यानंतर पोलीस उप आयुक्त, वाहतूक यांचेकडुन ऑनलाईन दंड पावती (चलन) क्रमांक नगुद असलेल्या कर्षित पावती बुकाची पडताळणी करण्यात यावी.

१८) शासकीय दंडाव्यतीरिक्त आकारणी करण्यात येणाऱ्या कर्षित दंडाच्या पावती पुस्तीका पोलीस उप आयुक्त, वाहतुक हे प्रमाणीत करुन वाटप व नियमन करतील.संपलेली पावती पुस्तीका आपले कार्यालयात जमा करून घेतील.

१९) पोलीस उप आयुक्त, वाहतूकहे खाजगी कर्षित वाहनांचे पावती बुकावर ऑनलाईन दंड पावती (चलन) क्रमांक असल्याचे पाहुन खातरजमा केल्याबाबत शेवटच्या पृष्ठांवर साक्षांकन करतील.

२०) पोलीस उप आयुक्त, वाहतूक यांनी दरमहा किती कर्षित पावती बुक वितरीत केले व कारवाईनंतर संपलेले पावती बुक जमा केले याची माहिती खालील नमुद तक्त्याप्रमाणे इकडील कार्यालयात सादर करतील.

| अ. क्र. | वाहतुक उप विभाग | कर्षित वाहन क्रमांक व कंपनी नाव | वितरीत कर्षित पावती बुक संख्या | जमा कर्षित बुक संख्या | जमा कर्षित बुक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |

२१) पोलीस उप आयुक्त, वाहतूकहे दर महिन्याच्या २ तारखेस कर्षित वाहनांद्वारे टोईंग केलेल्या कारवाईचा आढावा घेतील व मासिक अहवाल उप विभाग निहाय खालील तक्त्याप्रमाणे इकडील कार्यालयात सादर करतील.

| अ. क्र. | वाहतुक उप विभाग | कर्षित वाहन क्रमांक व कंपनीचे नाव | विभागातील कर्षित वाहनांची संख्या | कर्षित वाहनावरील अंमलदार नाव, हुद्दा | कर्षित कारवाई केलेल्या वाहनांचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | जड वाहने | हलकी वाहने | तिन चाकी वाहने | दोन चाकी वाहने | कर्षित दंडाची एकुण रक्कम |
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

